

"विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा"

**यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, बुलढाणा** व
शिवराज शिक्षण संस्था, अंत्रीतेली यांच्या संयुक्त विद्यमाने

# यशस्वी भव:

## गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शन

श्री./सौ.------------------------------------------------------------------------------------------------

स्पर्धेच्या या युगात कठोर परिश्रम आणि चिकाटीने स्वत:ला सिद्ध करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करणे आपली सामाजिक जबाबदारी आहे. या जाणिवेतून **यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, बुलढाणा व शिवराज शिक्षण संस्था, अंत्रीतेली** यांच्या संयुक्त विद्यमाने एमपीएससी, यूपीएससी मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा सन्मान, बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य यादीत झळकलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांसाठी तज्ञांचे विशेष मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यशस्वितांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारून परीक्षार्थींना प्रेरणा देणाऱ्या **यशस्वी भव:** या सोहळ्यास आपण उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**शुभहस्ते**
**मा.निलेश तांबे (भा.पो.से.)**
(पोलीस अधिक्षक, बुलढाणा)

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**
**मा.डॉ.राजेंद्र शिंगणे**
(मा.मंत्री तथा अध्यक्ष बुलडाणा जिल्हा केंद्र)

**विशेष अतिथी**
**मा.धीरज लिंगाडे**
(आमदार, अमरावती पदवीधर मतदारसंघ)

**मुख्य मार्गदर्शन**
**मा.प्रा.गणेश कड सर**
(गणेश कड अकॅडमी, पुणे)

**प्रमुख उपस्थिती**

**मा.अनिल अकाळ**
(माध्यमिक शिक्षणाधिकारी,बुलढाणा)

**मा.विकास पाटील**
(प्राथमिक शिक्षणाधिकारी,जि.प.बुलढाणा)

**रविवार दि. २९ जून २०२५ वेळ सकाळी ११ वा.**
**स्थळ - राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्ट सभागृह, ए. आर. डी. सिनेमॉलच्या मागे, मलकापुर रोड, बुलढाणा**

**विनित**

**नरेश शेळके** (सचिव, जिल्हा केंद्र बुलडाणा)

**कार्यकारिणी सदस्य**

प्रा.रामकृष्ण म्हस्के
डॉ.सौ.विजयाताई काकडे
डॉ.सौ.निलिमाताई देशमुख
डॉ.सिताराम कानडजे
डॉ.अण्णासाहेब म्हळसणे
सौ.कोमलताई झंवर
विजय गवारगुर
रणजीतसिंह राजपूत
सौ.उर्मिलाताई बावस्कर
अशोकराव निकम
ज्ञानेश्वर वायाळ
अजीम नवाज राही
सुरेश देवकर

**समन्वयक**

डॉ.गायत्री सावजी (युवा विभाग) प्रा.ज्योतीताई पाटील (महिला विभाग), डॉ.ज्योतीताई खेडेकर (आरोग्य विभाग), प्रा.मनिषा राऊत (शिक्षण विभाग), ह.भ.प.शंकर महाराज राजपूत (सांस्कृतिक विभाग)

Scanned with OKEN Scanner



"विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा"

# यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, बुलढाणा
व
## शिवराज शिक्षण संस्था, अंत्री तेली यांच्या संयुक्त विद्यमाने

SHIVRAJ

# यशस्वी भव:
## गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शन

रविवार दि. 29 जून 2025
वेळ सकाळी ११ वा.
-: स्थळ :-
राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्ट सभागृह,
ए. आर. डी. सिनेमॉलच्या मागे,
मलकापुर रोड, बुलढाणा

**शुभहस्ते**
मा. निलेश तांबे (भा.पो.से.)
(पोलीस अधिक्षक, बुलढाणा)

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**
मा. डॉ. राजेंद्र शिंगणे
(मा. मंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा केंद्र, बुलडाणा)

**विशेष अतिथी**
मा. धीरज लिंगाडे
(आमदार, अमरावती पदवीधर मतदारसंघ)

**मुख्य मार्गदर्शन**
मा. प्रा. गणेश कड सर
(गणेश कड अकॅडमी, पुणे)

**प्रमुख उपस्थिती**
मा. अनिल अकाळ
माध्यमिक शिक्षणाधिकारी, बुलढाणा

मा. विकास पाटील
प्राथमिक शिक्षणाधिकारी, जि.प. बुलढाणा

**विनित :- नरेश शेळके** (सचिव, जिल्हा केंद्र, बुलडाणा)

**कार्यकारिणी सदस्य**
- प्रा. रामकृष्ण म्हस्के
- डॉ. सौ. विजयाताई काकडे
- डॉ. सौ. निलिमाताई देशमुख
- डॉ. सिताराम कानडजे
- डॉ. अण्णासाहेब म्हळसणे
- सौ. कोमलताई झंवर
- विजय गवारगुर
- रणजीतसिंह राजपूत
- सौ. उर्मिलाताई बावस्कर
- अशोकराव निकम
- ज्ञानेश्वर वायाळ
- अजीम नवाज राही
- सुरेश देवकर

**समन्वयक**
डॉ. गायत्री सावजी (युवा विभाग) प्रा. ज्योतीताई पाटील (महिला विभाग),
डॉ. ज्योतीताई खेडेकर (आरोग्य विभाग), प्रा. मनिषा राऊत (शिक्षण विभाग),
ह.भ.प. शंकर महाराज राजपूत (सांस्कृतिक विभाग)

Scanned with OKEN Scanner



"विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा"

# यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, बुलढाणा

# यशस्वी भवः

# गुणवंतांचा सत्कार सोहळा

## सन्मानपत्र

**इवल्याशा सिद्धीस.....**

सिद्धी, तू सहाव्या वर्षी चिमुकली असताना मॅरेथॉन स्पर्धेपासून तुझ्या धाडस, चिकाटी ,सातत्य, मेहनत आणि ध्येयनिष्ठेची विविध मॅरेथॉन स्पर्धांमधून चमक दाखविली .केवळ बुलढाणा जिल्हा किंवा महाराष्ट्राची सुवर्णकन्या म्हणून नव्हे, तर भारताची शान म्हणून तू डोंगर पाषाणाशी संघर्षातून दोस्ती केली .सह्याद्रीची " हिरकणी " असलेल्या तू इयत्ता पहिलीमध्येच 5400 फूट उंचीचे महाराष्ट्रातील सर्वात उंच कळसुबाई शिखर गाठले .

यावर कळस म्हणजे 26 जानेवारी 2025 रोजी 12500 फूट उंचीचे " केदारकंठा" शिखर सर करून तेथे तिरंगा फडकवला.

अतिशय सामान्य शेतकरी कुटुंबातील तुझी "इंडिया बुक्स ऑफ रेकॉर्डने" तुझी दखल घेतली . अशा तुझ्या अद्भुत कर्तुत्वाचा **यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, बुलढाणा** तर्फे नोंद घेऊन **विशेष गौरव** करताना आम्हाला आनंद होत आहे. रॅपलिंग च्या धडाडीसाठी तुझे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !



धन्यवाद

बुलडाणा
दि. २९ जून २०२५

| | | |
|---|---|---|
| **डॉ.अण्णासाहेब म्हळसणे** | **नरेश शेळके** | **डॉ.राजेंद्र शिंगणे** |
| (अध्यक्ष- निवड समिती तथा सदस्य,जिल्हा केंद्र,बुलडाणा ) | (सचिव- जिल्हा केंद्र,बुलडाणा) | (अध्यक्ष- जिल्हा केंद्र,बुलडाणा) |

Scanned with OKEN Scanner



"विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा"

# यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, बुलढाणा

# यशस्वी भव:

# गुणवंतांचा सत्कार सोहळा

## सन्मानपत्र

मा.................................................................................................

आपल भविष्य उज्वल करण्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या आई-वडिलांच्या डोळ्यातील स्वप्न साकार करण्यासाठी आपण जिद्द, चिकाटी, मेहनत आणि सातत्याने प्रचंड अभ्यासाद्वारे **बारावीमध्ये उत्तुंग यश** प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन..!

या भक्कम पायावर पुढील शिक्षणाची मजबूत इमारत उभी करून पुढील उज्वल भविष्याची दिशा ठरावी यासाठी सामाजिक दायित्वाचा भाग म्हणून **यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र ,बुलढाणा** तर्फे आपणास सन्मानित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

धन्यवाद



बुलडाणा
दि. २९ जून २०२५

**डॉ.अण्णासाहेब म्हळसणे**
(अध्यक्ष- निवड समिती तथा सदस्य,जिल्हा केंद्र,बुलडाणा )

**नरेश शेळके**
(सचिव- जिल्हा केंद्र,बुलडाणा)

**डॉ.राजेंद्र शिंगणे**
(अध्यक्ष- जिल्हा केंद्र,बुलडाणा)

Scanned with OKEN Scanner



“विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा”

## यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, बुलढाणा

# यशस्वी भव:

# गुणवंतांचा सत्कार सोहळा

## सन्मानपत्र

मा.............................................................................................................................

आपण अतिशय जिद्दीने, चिकाटीने, सातत्याने, मेहनत घेऊन ध्येय साध्य केले. रक्ताचे पाणी आणि हाडाची काड करणाऱ्या आई-वडिलांच्या डोळ्यातील स्वप्न पूर्ण केले. आपण धारण केलेल्या पदास न्याय देतानाच, समाजाची सेवा घडून राष्ट्रनिर्माण कार्यात आपले योगदान रहावे अशी आपणाकडून अपेक्षा!

सामाजिक दायित्व म्हणून **यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, बुलढाणा** तर्फे **यशस्वी भव:** गौरव सोहळ्यातून आपणास सन्मानित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

अभिनंदन..! आणि शुभेच्छा !!

धन्यवाद



बुलडाणा
दि. २९ जून २०२५

**डॉ.अण्णासाहेब म्हळसणे**
(अध्यक्ष- निवड समिती तथा सदस्य,जिल्हा केंद्र,बुलडाणा )

**नरेश शेळके**
(सचिव- जिल्हा केंद्र,बुलडाणा)

**डॉ.राजेंद्र शिंगणे**
(अध्यक्ष- जिल्हा केंद्र,बुलडाणा)

Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner

# यशवंतराव चव्हाण सेंटरव्दारा उद्या गुणवंतांचा सत्कार व मार्गदर्शन

**बुलढाणा**, दि. २७ (प्रतिनिधी)

स्थानिक राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्ट सभागृह येथे यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा व शिवराज शिक्षण संस्था अंत्रीतेली यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शनाचे आयोजन २९ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. यूपीएससी, एमपीएससीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवरांचा सन्मान, बारावीच्या परीक्षेत विशेष प्रविण्य यादी झळकलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच स्पर्धा परिक्षेची तयारी करणाया युवकांसाठी तज्ञांचे विशेष मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे तर या कार्यकमाचे उद्‌घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, विशेष अतिथी विधान परिषद आमदार धिरज लिंगाडे, प्रमुख मार्गदर्शक प्रा. गणेश कड, प्रमुख उपस्थिती माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अटकळ, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, यांची असणार आहे. तरी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणाचे सचिव नरेश शेळके आदींनी केले आहे.

Buldhana Edition

Jun 28, 2025 Page No. 02

Powered by: erelego.com

Scanned with OKEN Scanner

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City

# यशवंतराव चव्हाण सेंटर व्दारा गुणवंतांचा सत्कार व मार्गदर्शन सोहळयाचे आयोजन

**बुलढाणा, २६ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा प शिवराज शिक्षण संस्था अंत्रीतेली यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यूपीएससी, एमपीएससी, मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवरांचा सन्मान, बारावीच्या परी-क्षेत विशेष प्रविण्य यादी झळकलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या युवकांसाठी तज्ञांचे विशेष मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यशस्वितांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारून परीक्षार्थींना प्रेरणार देणाऱ्या यशस्वी भवः सोळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दिनांक २९ जून रोजी सकाळी ११ वाजता, राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्ट सभागृह एआरडी सिनेमॉलच्या मागे, मलकापूर रोड, बुलढाणा येथे होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे तर या कार्यकमाचे उद्घाटन जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, विशेष अतिथी विधान परिषद आमदार धिरज लिंगाडे, प्रमुख मार्गदर्शक प्रा.गणेश कड, प्रमुख उपस्थिती अनिल अटकळ माध्यमिक शिक्षणाधिकारी, विकास पाटील प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांची असणार आहे. तरी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन. यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा चे सचिव नरेश शेळके, कार्यकारणी सदस्य डॉ.अण्णासाहेब म्हळसणे, रणजीतसिंग राजपूत, प्रा.रामकृष्ण म्हस्के, ज्ञानेश्वर वायळ, डॉ.विजयाताई काकडे, कोमलताई झंवर, उर्मिलाताई बावस्कर, अजीम नवार राही, डॉ.निलिमाताई देशमुख, विजय गवारगुर, अशोकराव निकम, सुरेश देवकर, डॉ.सिताराम कानडजे, समन्वयक युवा विभाग गायत्री सावजी, महिला विभाग, प्रा.ज्योतताई पाटील, आरोग्य विभाग डॉ.ज्योतीताई खेडेकर, शिक्षण प्रा.मनिषा राऊत, सांस्कृतिक विभाग ह.भ.प. शंकर महाराज राजपूत यांच्या वतीने करण्यात आले आहे.



Scanned with OKEN Scanner

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

# विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि आभास मधला फरक समजून घ्यावा : प्रा.गणेश कड

**बुलढाणा, २ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी)** : विद्यार्थी एखादा मोटिवेशनल व्हिडिओ पाहून प्रेरित होतो आणि स्पर्धा परीक्षा ची तयारी करायला लागतो. त्यामध्ये पुणे सारख्या ठिकाणी येऊन स्पर्धा परीक्षा ची तयारी करतो . त्यामध्ये मग कुणी ४ तास अभ्यास करतो ८ तास अभ्यास करतो. तुम्हाला मनाला वाटते की आम्ही एवढ्या तास अभ्यास केला परंतु हा फक्त आभास आहे, तुम्ही त्यातलं किती वेचलं हाच खरा तुमचा अभ्यास आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि आभास मधला फरक समजावून घेणं गरजेचे आहे असे मत प्रा.गणेश कड, गणेश कड एकेडमी, पुणे चे संचालक यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा व शिवराय शिक्षण संस्था अंत्रि तेली यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वी भव: गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शनाच्या निमित्ताने बुलढाणा येथे दिनांक २९ जून २०२५ रोजी झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष तथा माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे तर शुभ हस्ते आमदार धीरज लिंगाडे होते. जिल्ह्यातील एमपीएससी, यूपीएससीच्या माध्यमातून अलीकडच्या काळात निवड झालेल्या अ व ब वर्गातील उमेदवारांचा सत्कार व तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रम राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट इमारत, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धा परीक्षा ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी खास गणेश कड अकॅडमी , पुणे येथील प्रा. गणेश कड सर प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये नरेश शेळके सचिव, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, बुलढाणा यांनी सांगितले की, जिल्ह्यामध्ये स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा सत्कार करताना त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देताना त्यांच्या हातून सर्वसामान्यांना न्याय देत असताना त्यांच्याकडून राष्ट्र निर्माण कार्यात मोलाचे योगदान द्यावे व यांच्या कडून प्रेरणा घेऊन इतर विद्यार्थ्यांनी देखील आपल्या यश संपादित करावं यासाठी पेरणा व मार्गदर्शन यशस्वी भव: कार्यक्रमातून मिळावी या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिवाय बारावी मध्ये बोर्डाच्या परीक्षेत आपापल्या कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे देखील सन्मानपत्र व पुष्प देऊन स्वागत केले व त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी कु.सिद्धी राजू सोनवणे हिचा करण्यात आला. सिद्धीने वडिलांची गरिबी व कौटुंबिक अडचणीला आपल्या प्रगतीला बाधा न बनवता चिकाटी व मेहनतीच्या जोरावर वयाच्या अवघ्या नव्या वर्षी महाराष्ट्रातील सर्वात कठीण कोकण कडा हे शिखर सर करून इंडिया ग्रीनीज बुक ऑफ रेकॉर्ड नाव नोंदविला आहे. या चिमुकलीचा सन्मानपत्र देऊन सत्कार करताना उपस्थितांची छाती अभिमानाने भरून आली. तिच्या उज्वल भविष्यासाठी देखील तिच्या पाठीमागे आपण सर्वांनी उभे राहावं अशी आशा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरचे प्रा.रामकृष्ण मस्के ,डॉ.अण्णासाहेब मळसणे, रणजीतसिंग राजपूत, ज्ञानेश्वर वायाळ, डॉ.विजयाताई काकडे, उर्मिलाताई बावस्कर , विजय गवारगुर, अशोकराव निकम, सुरेश देवकर, डॉ.गायत्रीताई सावजी, प्रा.ज्योतीताई पाटील, डॉ.ज्योतीताई खेडेकर, ह भ प शंकर महाराज, प्रा.अंजली गाढे, प्रा.सचिन खरे, प्रा.रवींद्र गाडेकर, प्रा.दीपक आमले, प्रा.आर डी जाधव, प्रा.गजानन चौधरी, प्रा.तरमळे, प्रा.चव्हाण यांनी परिश्रम घेतले. यावेळी पीएम जाधव, भगवानराव शेळके, तुळशीराम काळे, नसीम शेठ, नाझीमाताई खान,माजी सभापती लक्ष्मीताई शेळके, नंदिनी टापरे, अनिल कोळसे, खांडवे सर ,हरिदास अंभोरे, पुरुषोत्तम पडघान, काकडे, गोपाळराव देशमुख, गजानन भिवसनकर, विश्वासराव शेळके, शिवदास शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते





Scanned with OKEN Scanner

पुण्य नगरी

# विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि आभासमधला फरक समजून घ्यावा : प्रा. गणेश कड

बुलढाणा, दि. २ (प्रतिनिधी)

विद्यार्थी एखादा मोटिवेशनल व्हिडिओ पाहून प्रेरित होतो आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करायला लागतो. त्यामध्ये पुणे सारख्या ठिकाणी येऊन स्पर्धा परीक्षा ची तयारी करतो . त्यामध्ये मग कुणी चार तास अभ्यास करतो, कुणी आठ तास अभ्यास करतो. अभ्यास करणे म्हणजे फक्त सिल्याबस वाचन नव्हे. तुम्ही किती तास अभ्यास केला यापेक्षा तुम्ही त्यातलं किती वेचलं हा महत्वाचा भाग आहे. तुम्हाला मनाला वाटते की आम्ही एवढा तास अभ्यास केला. परंतु हा फक्त आभास आहे, तुम्ही त्यातलं किती वेचलं हाच खरा तुमचा अभ्यास आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि आभास मधला फरक समजावून घेणं गरजेचे आहे, असे मत प्रा.गणेश कड यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट इमारतीत यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा व शिवराय शिक्षण संस्था अंत्रि तेली यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वी भवः गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शनाच्या निमित्ता २९ जून २०२५ रोजी झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी गणेश कड एकेडमी, पुणेचे संचालक प्रा.गणेश कड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष तथा माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे होते. यावेळी आमदार धिरज लिंगाडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील एमपीएससी, यूपीएससीच्या माध्यमातून अलीकडच्या काळात निवड झालेल्या अ व ब वर्गातील उमेदवारांचा सत्कार व तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी आमदार धीरज लिंगाडे, डॉ. राजेंद्र शिंगणे आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरचे प्रा. रामकृष्ण मस्के, डॉ. अण्णासाहेब मळसणे, रणजीतसिंग राजपूत, ज्ञानेश्वर वायाळ, डॉ. विजयाताई काकडे, उर्मिलाताई बावस्कर, विजय गवारगुर, अशोकराव निकम, सुरेश देवकर, डॉ. गायत्री सावजी, प्रा.ज्योतीताई पाटील, डॉ.ज्योतीताई खेडेकर, हभप शंकर महाराज, प्रा. अंजली गाढे, प्रा. सचिन खरे, प्रा.रवींद्र गाडेकर, प्रा. दीपक आमले, प्रा.आर डी जाधव, प्रा. गजानन चौधरी, प्रा.तरमळे, प्रा.चव्हाण, मीनाक्षी सरदेशमुख यांनी परिश्रम घेतले. यावेळी पीएम जाधव, भगवानराव शेळके, तुळशीराम काळे, नसीम शेठ, नाझीमाताई खान, माजी सभापती लक्ष्मीताई शेळके, नलिनी टापरे, अनिल कोळसे, खांडवे, हरिदास अंभोरे, पुरुषोत्तम पडघान, काकडे, गोपाळराव देशमुख, गजानन भिवसनकर, विश्वासराव शेळके, शिवदास शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

Buldhana Edition
Jul 03, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

Scanned with OKEN Scanner

लोकमत

# अभ्यास अन् आभासातील फरक समजून घ्यावा!

## 'यशस्वी भव' कार्यक्रमात प्रा. गणेश कड यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क



गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे व इतर.

**बुलढाणा :** सध्या अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी प्रेरणादायी व्हिडिओ बघून तयारीला लागतात. मात्र, यामध्ये अभ्यास आणि आभास यातील सूक्ष्म फरक समजून घेणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत प्रा. गणेश कड यांनी व्यक्त केले. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना किती तास अभ्यास केला यापेक्षा त्या अभ्यासातून काय आत्मसात केले, हे महत्त्वाचे असून, अभ्यासाच्या नावाखाली वेळेचा केवळ आभास निर्माण होतो, असा इशाराही त्यांनी दिला.

**२९ जून रोजी यशवंतराव सेंटरमध्ये झाला कार्यक्रम**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, बुलढाणा व शिवराय शिक्षण संस्था, अंत्रीतेली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'यशस्वी भव' गुणवंतांचा सत्कार सोहळा व मार्गदर्शन कार्यक्रमप्रसंगी २९ जून रोजी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष तथा माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे होते, तर आमदार धीरज लिंगाडे उपस्थित होते. जिल्ह्यातील एमपीएससी, यूपीएससीच्या माध्यमातून अलीकडच्या काळात निवड झालेल्या अ व ब वर्गातील उमेदवारांचा सत्कार व तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट, बुलढाणा येथे करण्यात आला.

**सिद्धी सोनवणेंचा केला सत्कार**

सचिव नरेश शेळके यांनी प्रास्ताविकात स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या गौरवामागचा हेतू मांडला. आमदार लिंगाडे यांनी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांची आठवण करून दिली. डॉ. शिंगणे यांनी यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनत असल्याचे सांगून गुणवंतांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.



Scanned with OKEN Scanner